# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## कृषि नगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

Phone No. : 0724-2258372
Fax No. : 0724-2258386
E-Mail – registrar@pdkv.ac.in

**डॉ. पी.आर. कडू**
कुलसचिव


**<u>अती महत्वाचे/ कालमर्यादा</u>**

**<u>मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणे सादर करण्याबाबत.....</u>**

**वाचा :** (१) शासन निर्णय क्र. वशिअ-१२१४/प्र.क्र. २६/११, दि. ०२ जून, २०१४
(२) शासन निर्णय क्र. वशिअ-१२१४/प्र.क्र. ५१ (२)/११, दि. १७ नोव्हेंबर,२०१४
(३) कृषि परिषद यांचे पत्र क्र. मकृप/आस्था-३/प्र.क्र. ९५१३/१५८०/२०१४, दि. ०२/०७/२०१४

## <u>परिपत्रक</u>

क्र. बीएबी/कर्मचारी मालमत्ता/२०१८/९० दिनांक : २८ मार्च, २०१८

विद्यापीठा अंतर्गत कार्यरत असलेले सर्व अधिकारी/ कर्मचारी (गट-ड मधील कर्मचारी वगळता) यांनी उपरोक्त शासन निर्णय तसेच कृषि परिषद यांच्या पत्रानुसार विद्यापीठ सेवेत नव्याने नियुक्त झाले असल्यास त्यांच्या **<u>प्रथम नियुक्तीच्या दिनांकाच्या स्थितीस अनुसरुन किंवा दि. ३१ मार्च, २०१८ च्या स्थितीस</u> अनुसरुन मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरण प्रपत्र-१, प्रपत्र-२ व प्रपत्र-३** मध्ये भरुन सादर करावयाची आहेत.

त्याअनुषंगाने विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेले सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, त्यांच्या कार्यालयाचे अधिनस्त वेतन व भत्ते काढण्यात येत असलेले सर्व अधिकारी/ कर्मचारी (गट-ड मधील कर्मचारी वगळता) यांच्या मत्ता व दायित्वेबाबतची गटनिहाय माहिती (गट-अ ते गट-क) नुसार द्यावयाची आहे. त्यामुळे सदर परिपत्रकासोबत जोडलेल्या मार्गदर्शक सुचना सर्व अधिकारी/ कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून **विवरण प्रपत्र-१, प्रपत्र-२ व प्रपत्र-३** मध्ये त्यांचेकडून विद्यापीठ सेवेत नव्याने नियुक्त झाले असल्यास त्यांच्या **<u>प्रथम नियुक्तीच्या दिनांकाच्या स्थितीस अनुसरुन किंवा दि. ३१ मार्च, २०१८ च्या स्थितीस अनुसरुन</u>** मत्ता व दायित्वेबाबतची संपूर्ण, अचूक व स्तंभनिहाय माहिती (तीनही विवरण प्रपत्रे) एका सीलबंद पाकीटामध्ये आपल्या कार्यालयीन स्तरावर प्राप्त करुन घेण्यात यावी. तसेच प्राप्त झालेली सर्व सीलबंद पाकीटे यासोबत जोडलेल्या **'विवरणपत्र-अ'** मध्ये माहिती भरुन **<u>दि. ३१ मे, २०१८ पर्यंत</u>** पाठविण्यात यावी.

त्याचप्रमाणे सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना असेही कळविण्यात येते की, ज्या अधिकारी/ कर्मचारी यांचे मत्ता व दायित्वे वार्षिक विवरणपत्रे विहित कालावधीत प्राप्त होणार नाहीत त्यांचे सदर विवरणपत्रे प्राप्त होईपर्यंत **<u>माहे जुलै, २०१८ ची वार्षिक वेतनवाढ</u>** निर्गमीत करु नये व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

तसेच उपरोक्त नमूद केलेल्या विवरणपत्रांमधील मत्ता व दायित्वेसंबंधीची माहिती विहीत कालावधीत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास अथवा सदर माहिती चुकीची आढळल्यास संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांचेविरुध्द शासन निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सर्व दस्तऐवजांच्या प्रति विद्यापिठाच्या संकेतस्थळावर (www.pdkv.ac.in) प्रसिद्ध करण्यात येत असुन त्यासंबंधी आपल्या कार्यालयीन स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने.

**स्वा/-**
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रति,

.................................................
.................................................

प्रतिलिपी :

१. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती केंद्र (ARIS Cell), डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाही करिता.
२. कुलगुरु यांचे स्विय सहायक,यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहितीकरिता सादर.

